**केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम या योजनेची SNA-SPARSH या निधी वितरण कार्यपद्धतीद्वारे अंमलबजावणी करण्याकरीता केंद्र शासनाने Mother Sanction द्वारे मंजूर केलेला केंद्र हिस्सा व समरूप राज्य हिस्सा निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: अ.वि.वि-२०२५/प्र.क्र.५०(भाग-३)/का-७**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक: २१/०५/२०२६**

**संदर्भ :-**

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३,दि.०७/०४/२०२५ व शुध्दीपत्रक दि.१७/१०/२०२५,
२. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र.१०८/अर्थ-३, दि.०८/०१/२०२५,
३. शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा-प्रशा-४, दि.१०/१०/२०२४,
४. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. २०२५/प्र.क्र. ५०(भाग-१)/कार्या-७, दि.१४/०८/२०२५.
५. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.अविवि-२०२५/प्र.क्र.५०(भाग-२)/कार्या-७, दि.०५/०९/२०२५.
६. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. अविवि-२०२५/प्र.क्र.५०(भाग-३)/कार्या-७, दि.०९/०९/२०२५ व शुध्दीपत्रक दि.१०/१०/२०२५.
७. केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.२१/१९/२०२५-MsDP-MoMA,दि.२४/१०/२०२५.(Co.No.१४८००५).
८. केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.२१/१९/२०२५-MsDP-MoMA,दि.०३/०३/२०२६.(Co.No.१४८००५).
९. केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.००१/३५/२०२६-PMJVK, दि. २६/०३/२०२६.(Co.No.१५०६३६).

**प्रस्तावना :-**

विभागामार्फ़त केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम ही योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत केंद्र व राज्य हिश्याचे निधी प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरावरील रोख व्यवस्थापनामध्ये (Cash Management) अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी SNA SPARSH ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती लागू करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. संदर्भ क्र. ६ अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रमांतर्गत राज्य संलग्नित योजनेकरीता SNA SPARSH या निधी वितरण प्रणालीची अंमलबजावणी करण्याकरीता भारतीय रिझर्व्ह बँक येथे स्वतंत्र आहरण खाते उघडण्यास मान्यता प्रदान केली आहे. या मान्यतेस अनुसरुन केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जन विकास

कार्यक्रम या योजेनेकरीता "SNA SPARSH" प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्याकरीता भारतीय रिझर्व्ह बँके येथे स्वतंत्र आहरण खाते “GOMHSPARSHMH461” उघडण्यात आले आले असून त्याचा खाते क्र. ०१५८५९०१५५० असा आहे. तसेच "SNA SPARSH" समायोचित प्रणाली अंतर्गत सायबर कोषागारावर देयके आहरित करण्याकरीता 'कक्ष अधिकारी (कार्यासन-७), अल्पसंख्याक विकास विभाग यांना सायबर आहरण व संवितरण अधिकारी (Cyber DDO) म्हणून घोषित करण्यात असून त्याचा सांकेतांक क्र. (Cyber DDO Code) “८१०१७१००१७” असा आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम या योजनेकरिता SLS- MH ४६१ अंतर्गत रुपये ५.०० कोटी (अक्षरी रुपये पाच कोटी फ़क्त) इतक्या रकमेची मंजूरी दिली असल्याचे संदर्भाधीन क्र. ९ येथील पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुषंगाने सदर केंद्र हिश्याचा रु. ५.०० कोटी इतका निधी व त्यास समरूप राज्य हिश्याचा रु. ३.३३ कोटी इतका निधी या योजनेचे “सायबर आहरण व संवितरण अधिकारी” (Cyber DDO Code : ८१०१७१००१७) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

१. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम या योजनेकरिता केंद्र शासनाने मंजूर केलेला केंद्र हिस्सा रु. ५.०० कोटी इतका निधी व त्यास समरूप राज्य हिस्सा रू. ३.३३ कोटी असा एकूण रुपये ८.३३ कोटी (अक्षरी रुपये आठ कोटी तेहत्तीस लाख फ़क्त) इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी खर्च करण्यासाठी “कक्ष अधिकारी (कार्यासन-७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई” यांना सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तर सह सचिव (कार्यासन-७), अल्पसंख्याक विकास विभाग हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.

३. शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी यांनी ताबडतोब उक्त निधी SNA-SPARSH प्रणालीवर कार्यान्वित करुन घ्यावा.

४. वरील निधीचा विनियोग करताना केंद्र सरकारचे वित्त मंत्रालय व अल्पसंख्याक कार्य मंत्रालय तसेच वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित निकष, वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे व अटी-शर्तीचे अनुपालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

५. केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम या योजनेकरिता निधी वितरीत करावयाच्या लेखाशिर्षांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

**१) अल्पसंख्याक विकास विभाग मागणी क्र. झेडई-०१**

२२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण,

०२ समाजकल्याण

२०० - इतर कार्यक्रम

केंद्र पुरस्कृत योजना (००) (१७) अल्पसंख्याक प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम

(सर्वसाधारण) (**केंद्र हिस्सा ६० टक्के**) (कार्यक्रम) (२२३५ A५४३)

३१ - सहाय्यक अनुदान (वेतनेतर)

**२) अल्पसंख्याक विकास विभाग मागणी क्र. झेडई-०१**

२२३५ - सामाजिक सुरक्षा व कल्याण,

०२ समाजकल्याण

२०० - इतर कार्यक्रम

केंद्र पुरस्कृत योजना (०१) (१४) अल्पसंख्याक प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम (सर्वसाधारण)

(**राज्य हिस्सा ४० टक्के**) (कार्यक्रमावरील खर्च ) (२२३५ A२३१)

३१ - सहाय्यक अनुदान (वेतनेतर)

६. नियंत्रक अधिकारी यांनी वरील खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे आवश्यक त्या माहितीसह केंद्र व राज्य शासनाकडे निर्धारित कालावधीमध्ये सादर करावीत.

७. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५२११५१०१२७२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK SURESH LOKARE

Digitally signed by DEEPAK SURESH LOKARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Minority Development Dept, 2.5.4.20=84FA0E4161C384FE5BB199680D742B01B9FF5E70EB03ACC5CF869939DF38FC7C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=96E09CC75F3C5CE534452384ACDEA2D6DE10039C9E34EAD32DBA3AC3466055D1, cn=DEEPAK SURESH LOKARE
Date: 2026.05.21 15:11:10 +05'30'

**( दिपक लोकरे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अवर सचिव (१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व परीक्षा ) मुंबई/नागपूर.
४. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मुंबई.
५. वित्त विभाग (अर्थसंकल्प -३/ व्यय -१) मंत्रालय, मुंबई.
६. नियोजन विभाग (कार्या.१४७१).
७. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. निवड नस्ती (का.७).